ISSN 2278-9243

# कविता-रती

जुलै-ऑगस्ट व सप्टेंबर-ऑक्टोबर २०२०
वर्ष ३५ वे, अंक ५ , ६



कवी आणि संपादक पुरुषोत्तम पाटील यांच्या स्मरणार्थ
काव्य, काव्यविचार, काव्यसमीक्षा व कविविमर्श यांना वाहिलेले द्वैमासिक

# कविता-रती

संस्थापक संपादक : पुरुषोत्तम पाटील संपादक : आशुतोष रमेश पाटील

जुलै-ऑगस्ट व सप्टेंबर-ऑक्टोबर २०२० ❑ वर्ष ३५ वे : अंक ५ व ६

## कविता

संतोष आळंजकर यांच्या कविता, केशव खटिंग ३,
प्रदीप कोकरे यांच्या कविता ४-६.

## अभिवादन

शरच्चंद्र मुक्तिबोध यांची कविता - हेमंत खडके ७-२०

## कविविमर्श

१. द. भा. धामणस्कर यांची कविता - सुधीर रसाळ २१-३६.
२. रवींद्र लाखे यांची कविता : आशय व रूपशोध - अरुण ठोके ३७-५२.

## कविता

रमेश रावळकर ५३, पुनीत मातकर यांच्या कविता ५४-५६,
श्वेतल अनिल परब यांच्या कविता ५७-५८,
विनोद नरेंद्र कुलकर्णी ५८.

## परीक्षण

'मरी मरी जाय सरीर' : योजना यादवची कविता - प्रमोद मुनघाटे ५९-६३.

## मर्मग्रहणे

१. अनुराधा पाटील यांच्या दोन कविता - दिलीप धोंडगे ६४-७२.
२. 'दमयंती स्वयंवर' : शंका आणि समाधान - अशोकलाल रणछोडदास शाह ७३-७७.

## कविता

मयूर राजपूत यांच्या कविता ७८-७९, क्रांती गायकवाड ७९,
प्रवीण बाबूलाल हटकर ८०.

## मुखपृष्ठ

अजित अभंग

# रवींद्र लाखे यांची कविता : आशय व रूपशोध

अरुण ठोके

रवीन्द्र दामोदर लाखे हे गेल्या चार दशकांहून अधिक काळापासून कविता लेखन करीत आहेत. त्यांचा 'जिव्हार' हा पहिला काव्यसंग्रह १९८३ मध्ये संवाद प्रकाशन संस्थेने प्रकाशित केला होता. त्यानंतर तब्बल ३५ वर्षांनी एप्रिल २०१८ मध्ये दिल्लीतील कॉपर कॉईन या प्रकाशन संस्थेने त्यांचे 'अवस्थांतराच्या कविता' व 'संपर्क क्षेत्राच्या बाहेर' हे दोन कवितासंग्रह प्रकाशित केलेले आहेत.

रवींद्र लाखे यांच्या कवितांतून मानवी जीवनाच्या नेटक्या वाटचालीचे सूतोवाच करण्यात येते. निसर्गातील पशु-पक्ष्यांचे वर्तनव्यवहार व मानवी वर्तनव्यवहार यात तुलना, जन्म व मृत्यूविषयीचे कुतूहल, दुःखाला झुगारून देण्याची अतिव ओढ, माणसांची स्वार्थी वृत्ती, महानगरातील जीवनाची अनिश्चितता, मानवी संबंधविच्छेदनाची तीव्र जाणीव, घराचे हरवलेले घरपण, शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करणारे शासन व राजकीय नेते, मानवी जगण्यातील व भाषेतील हिंस्त्रता, शोषणाचे संदर्भ, स्त्रीकडे पाहण्याचा पुरुषी दृष्टीकोन, जीवनातील निरर्थकतेचे विडंबन, धर्माचे बदललेले स्वरूप, देवाचे घटते महत्त्व, पैसाकेंद्री जीवनशैली असे अनेक प्रश्न, समस्या जाणिवांचे संमिश्रण किंवा स्वतंत्रपणे केलेले विवेचन प्रत्ययास येते. त्यांच्या कवितांचा आशय व रूप वेगळे करता येत नाहीत. भोवतालच्या घटितांची कल्पित घटितांशी जुळणी करून काव्याशय घडविला जातो. यातून कवीने घेतलेला आत्मशोध तत्त्वचिंतनाच्या पातळीवर पोहोचतो. मानवी भावना, विचार व सौंदर्यविषयक संकल्पनांतून माणूस दूर जात असल्याची तीव्र जाणीव या कवितांतून प्रकट होते. माणसांच्या विविध अवस्थांतरांचा शोध घेताना कवी संपर्कक्षेत्राच्या बाहेर राहणे पसंत करतो.

लाखेंच्या कवितांतील आशयातून कवीच्या व्यापक जीवनदृष्टीचा प्रत्यय येतो. या कवितांतील वैचारिकता जगण्याचे तत्त्वज्ञान तपासून पाहण्याचा प्रयत्न म्हणून अभिव्यक्त होते. भोवतालच्या वास्तवाचे अधिभौतिक पातळीवरील चिंतन अनोख्या रीतीने येत असल्याने जीवनमूल्यांची व्यापकता दर्शविणारे कालभान या कवितांतून प्रकट झालेले आहे. निर्णयशक्तीअभावी सामान्य माणसाच्या झालेल्या वर्तमान अवनतीचे सूचक चित्रण 'साशंक' या कवितेत करण्यात आलेले आहे. पृथ्वीवरील मानवाची वाटचाल जशा प्रकारे, ज्या दिशेने जायला हवी होती ती तशी होत नाहीये. विकासाच्या मागे धावताना आपली 'माणूस' म्हणून असलेली ओळख पुसून एका अराजकाच्या प्रवासाला माणूस

निघालाय हे भान 'आपण' या उपयोजनातून व्यक्त करण्यात येते. सर्जनशील अभिव्यक्तीला बांध घालण्यातून निर्माण झालेला बौद्धिक पेच या प्रकारे व्यक्त होतो. '...ह्या स्वतःविषयीच्या जथ्थ्याच्या संदर्भातील दहशतीतून/ जगणं शोषलं जातंय, अन् हातातल्या दिव्यानं वणवा उसळेल/ पडला खालीतर, म्हणून वणव्याच्या भीतीनं/ दिवा विझवून चाललोय आपण.' ('संपर्क क्षेत्राच्या बाहेर', पृ. १८)

कवितेतील 'मी'ला आपण शोषण व अन्यायाविरुद्ध आवाज उठवला म्हणजे यावर कविता लिहिली तर वणवा उसळण्याची खात्री असते. परंतु त्याच्या स्वतःवरील साशंकवृत्तीमुळे तो असे विषय टाळून अभिव्यक्ती करतो. किंवा दिवा विझवून चालतो म्हणजे न लिहिणेच पसंत करतो. न लिहिण्याचे कारण वणवा पसरण्याचे असते. हा वणवा जसा 'मी' ला चटके देणारा ठरू शकतो, ही एक शक्यता असते. तर त्याने 'दिवा विझवून' चालण्याच्या कृतीतून माणसांच्या अंधाराच्या दिशेने सुरू झालेल्या प्रवासाचेही एक सूतोवाच करण्यात आलेले आहे. असे व्हायला स्थळ-काळ परिस्थिती कारणीभूत असू शकते हा एक अर्थ झाला. दुसरा अर्थ असा की कविता लिहिणाऱ्या अनेकांनी भौतिक गोष्टींवर लक्ष केंद्रित करून स्वतःचा स्वार्थ साधण्याला प्राधान्य दिले. काव्यलेखनाला दुय्यम मानले. कवीने मात्र आयुष्यभर व्रतस्थपणे कविता लिहिली व तिच्यावर जीवापाड प्रेम केले. कविता न लिहिणे म्हणजे स्वतःलाच चटके बसून वणव्याच्या होरपळीचा अनुभव घेण्यासारखे वाटत असल्याचे सर्जनशील भान कवीच्या कविताप्रेमाचे निदर्शक आहे.

जात, धर्म व देश पातळीवर केल्या जात असलेल्या भेदांच्या पलीकडे निखळ माणूस म्हणून माणसाकडे पाहायला शिकले पाहिजे. पूर्वग्रह बाजूला ठेवून निखळपणू जगले पाहिजे असे तत्त्वज्ञान 'वास्तू' कवितेतून मांडण्यात आलेले आहे. परंतु प्रत्यक्षात असे होत नाही. समाजात वावरताना एकाच व्यक्तीला विविध वयोगटांत आलेल्या अनुभवांतून त्याचे मूळ व्यक्तित्व हरवत जावून तो शेवटी वावर नसलेल्या वास्तुसारखा टाकावू बनत जातो. माणसांचेच माणसाला उद्ध्वस्त करीत जाणे, माणूसपणाची हानी करणारे आहे. या हिंसक मानवी वृत्तीकडे लक्ष वेधण्यासाठी कवी 'वास्तू' या प्रतिमेशी 'मी'चे तादात्मीकरण करून घेतो.

'सगळीच्या सगळी पाखरं' या कवितेत पक्षी व माणूस यांच्या वर्तनातील सूक्ष्मभेद टिपून आनंद व दुःखाच्या तऱ्हा दर्शविण्यात आल्या आहेत. मानवाच्या नैसर्गिक वृत्ती-प्रवृत्तीत झालेले बदल व त्यातून निर्माण झालेले दुःख हे मानवनिर्मित आहे. असमाधान हे त्याचे मुख्य कारण होय. माणसाच्या दुःखी होण्याच्या कारणांचा जो विशाल पट लाखेंच्या कवितांत येतो, त्यातील हे एक प्रातिनिधिक उदाहरण होय. माणूस हा पृथ्वीवरील सर्वात बुद्धिमान प्राणी आहे. तो दीर्घायुषी आहे. मात्र त्याच्याच कृती व उक्तींतून त्याने ओढवून घेतलेल्या समस्या व प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी त्याची सतत झटापट सुरू असते. त्यातून

निर्माण झालेला ताण 'दिवसांचे ओझे घेवून मी उठतो' या शब्दांतून व्यक्त होतो. सायंकाळी 'कुरकुरत्या' समाधानासहित माणसाचे घरी परतणे आणि पाखरांनी उत्फुल्लपणे चिवचिवाटाने आसमंत जिवंत करून टाकणे या दोन्ही घटितांतील भेद दुःख व आनंदातील भेदाची दरी दर्शविणारा आहे. पक्ष्यांची आनंदी वृत्ती आपण अंगिकारायला हवी हे भान प्रस्तुत कवितेतून व्यक्त झालेले आहे.

लाखेंच्या कवितांतील चिंतन सूचक उद्बोधनातून वक्रतेने मांडण्यात येते. यासाठी अवलंबलेल्या संवादी शैलीमुळे ते वाचकाला थेट आवाहन करते. 'यम्मा यम्मा' या कवितेत हिंसक वृत्ती नेभळटपणे झेलणाऱ्या माणसाला चपराक लावण्यात येते. जीवन धीटपणे जगण्याची गोष्ट न कळल्याने माणसांत भित्री मनोवृत्ती वाढीस लागते. अशा भित्र्या मनोवृत्तीचे संदर्भ कवितेच्या पूर्वार्धात येतात. दुःख व शोषणाला दैवी परिस्थिती कारणीभूत असल्याने त्यातून मानवी हिंसेला वाट मोकळी करून देण्यात येते. वाईट कृत्य करणाऱ्या व्यक्तीला यम त्याच्या वाईट कृत्याच्या स्वरूपानुसार शिक्षा देतो. यमाने द्यावयाच्या शिक्षेचे अनेक प्रकार असल्याचे धर्मग्रंथात नमूद आहे. परंतु प्रत्यक्षात शोषण करणारी, दुःख देणारी व्यक्तीच विशिष्ट कृत्यांमुळे 'यम' बनून एखाद्या दुसऱ्या व्यक्तीचा जीव घेण्यासाठी कारणीभूत ठरलेली असते. अशा वेळी दैवी विचार न करता वैज्ञानिक दृष्टीने जीवनाकडे पाहायला हवे. आपल्या दुःखाच्या निवारणाचा मार्ग शोधला तर दुःख देणाऱ्याला किंवा 'यम' बनून मरणाची भिती घालणाऱ्यालाच पायदळी तुडविण्याची तयारी ठेवायला हवी, असे सूचक वर्णन करण्यात येते. कवितेचा शेवट अतिशय वेधक आहे.

मानवी वर्तनव्यवहाराच्या विविध तऱ्हांचे निरीक्षण करून त्यावर भाष्य करण्याचे प्रयत्न म्हणून घडविलेल्या कवितांपैकी 'फुकट्या' ही एक कविता होय. निसर्गनिर्मित वस्तू व मानवनिर्मित वस्तू असे दोन प्रकारे वस्तूंचे वर्गीकरण करता येईल. या दोन प्रकारच्या वस्तुंतून आपल्या भोवतालच्या विश्वाची रचना लक्षात येते. यातील सूर्य, चंद्र, झाडे, फुले, फळे या निसर्गनिर्मित वस्तू आहेत. घर, शिक्षण, वही, पेन यासारख्या मानवनिर्मित वस्तू होय. माणसाला अनेक प्रकारच्या वस्तू मोफत उपलब्ध असल्याने त्याच्यातील आळशी वृत्ती वाढीस लागते. 'फुकट्या' या शब्दातून माणसाच्या मतलबी वृत्तीच्या खास भारतीयतेची ओळख सूचित होते. अशा मतलबी मनोवृत्तीचा पदाफाश प्रस्तुत कवितेत करण्यात आलेला आहे. माणसाला मोफत व मुबलकरित्या मिळालेल्या गोष्टींचे मूल्य नसते. अविचारी वृत्तीने तो जगत राहतो. असे जीवन जगताना त्याच्या हातून अनेक प्रमाद घडतात. मात्र याविषयी त्याला कोणताही पस्तावा वाटत नसतो. फुकट मिळालेल्या निसर्गाच्या स्त्रोतांचे महत्त्व व 'माणूस' म्हणून ओळख प्राप्त करून देणाऱ्यांचाही त्याला विसर पडतो. नैसर्गिक वस्तू व भोवतालच्या विश्वाविषयी असलेली कृतज्ञता जावून त्यांना जसे बाजारू मूल्यांत स्थानांतरित करण्यात आलेले आहे. तसेच आई-वडील मित्र व

नातेसंबंधही विक्रेय मूल्य असलेले व्हावेत अशा प्रकारच्या सामाजिक पर्यावरणाची निर्मिती आपण करून ठेवत असल्याचे भयंकर वास्तव कवी मांडतो.

'विकसित' होताना माणूस निसर्ग व मानवी मूल्यांप्रतीच उतराई होत असल्याची टोकदार जाणीव करून देण्यात येते. ही स्थिती म्हणजे मानवी मूल्यांच्या विनाशाची पूर्वतयारीच होय. म्हणून आता तरी माणसाला त्याच्या पूर्वजांनी दिलेल्या सांस्कृतिक मुल्यांची आठवण व्हावी. त्या वाटेने त्याने परत फिरावे. अन्यथा शेवटी अंधारच वाटेला येईल. हा गर्भित इशारा कवितेतून देण्यात आलेला आहे. जर माणूस प्रामाणिकपणाच्या मार्गाने गेला नाही, 'फुकट्या' वृत्तीतच रमत राहिला तर एक दिवस पृथ्वीवरून माणसाचेच अस्तित्व नष्ट होईल, असे सूतोवाच प्रस्तुत कवितेच्या आशयातून ध्वनित होते.

समकालीन महानगरी वास्तवाचे चित्रण लाखेंच्या कवितांतून करण्यात आलेले आहे. भोवतालात घडणाऱ्या घटितांना काव्याशय देण्यात येतो. महानगरात अंधाधुंद गोळीबारासारख्या घटना सातत्याने व अनेक ठिकाणी घडतात. यातून माणसाच्या हिंसक वृत्तीत वाढ झाल्याचा प्रत्यय येतो. माणूसच माणसाचा जीव घेण्यासाठी उतावीळ झाल्याचे दिसते. एखाद्या व्यक्तीला इतरांच्या डोळ्यांसमोर गोळ्या घालून ठार मारले जात असताना इतर लोक या घटनेकडे सामान्यपणे पाहतात, याचे कवीला आश्चर्य वाटते. या आश्चर्यातून 'अपघात' ही संहिता निर्माण झालेली असावी. गोळीबारच सवयीचा करून घेणे, ही कृती कवीला अस्वस्थ करते. गोळीबारात मरणाऱ्या व्यक्तीच्या मृत्यूचे कुणालाही काहीही देणे-घेणे नसते; उलट त्या घटनेच्या विरुद्ध दिशेला लोक आपले व्यवहार आनंदाने उरकत असतात. कवीला अशा घटना, लोकांचे वर्तन ऋतूसंहार करणारे आहे, असे वाटते. कवी म्हणतो, 'ऋतूसंहार करणाऱ्या/ ह्या घटनांच्या दरम्यान / सुरळीत चालू असलेल्या सर्व / मानवी व्यवहारांनी / झाकले आहेत आपले डोळे/ महागड्या गॉगल्सनी / घटनांच्या धुरापासून/ बचाव म्हणून./ कानात घातले आहेत/ हेडसेट्स/ घटनांच्या स्फोटक आवाजांनी/ कानठळ्या बसू नयेत म्हणून./ ऐकताहेत पॉप रॉक जाझ/ लता आशा/ ए. आर. आणि इतर.' ('संपर्क क्षेत्राच्या बाहेर', पृ. ६७)

महानगरातील माणसांच्या कातडीबचाऊ प्रवृत्तीवर कोरडा ओढण्याच्या खास वक्रशैलीचा प्रत्यय प्रस्तुत संहितेत येतो. ही अशी 'दुर्लक्ष' करण्याची सामाजिक प्रवृत्तीच कवीच्या निषेधाच्या मुख्य विषय बनते. गोळीबारात माणूस मारला गेल्यानंतरही त्या घटनेला दुय्यम मानून आपल्याच कैफात, आनंदात रमणारी महानगरी माणसे माणूसपणालाच पारखी होत आहेत. अशा स्थितीत एखाद्या बेघर माणसाचे महत्त्व त्यांच्या नजरेत काय असेल? म्हणूनच अशा बेघर माणसांविषयीची कणव कवीला वाटते. घर नसलेल्या माणसांचे स्वगतच अपघातात हात किंवा पाय तुटून पडावे तसे तुटून पडले, असे अभिनव काव्यात्मक विधान करण्यात येते. असा बेघर माणूस, झालेल्या जखमेची जाणीव मरून जावी त्याप्रमाणे

बधिर होऊन तो आपल्या स्वगताकडे पाहत राहतो. अपघात ही एक जिवंत व्यक्ती मानून, बेघर माणसाचे पाहणे हे जसे अपघाताने चहूबाजूच्या परिसराकडे पाहावे त्याप्रमाणे असते, असे कल्पित चित्रण करण्यात येते. आजूबाजूच्या घडणाऱ्या अंदाधुंद घटनांच्या भडिमाराबद्दल माणसांची संवेदनक्षमता, दयाभाव, अहिंसात्मक वृत्ती कमी झाली असल्याचे सूचक चित्रण प्रस्तुत कवितेतून करण्यात आलेले आहे. शेवटी माणूस बेघर होणे म्हणजे दखलहीन होणे, त्याची ओळख पुसली जाणे याविषयीची चिंता करण्यातून कवीच्या प्रगल्भ संवेदनक्षमवृत्तीचा प्रत्यय येतो.

'लाइफ एक इव्हेंट' या कवितेत माणसांच्या नातेसंबंधात होत असलेल्या स्थित्यंतराकडे कवीने लक्ष वेधले आहे. घरांना घरपण उरले नाही. दिवाळी या सणाच्यावेळी विविध प्रकारचे फटाके फोडून व आतषबाजी करून आनंदोत्सव साजरा केला जात असे. या आनंदप्रसंगी कुटुंबातील सर्व घटक एकत्रित येत असत. सर्वजण एकमेकांच्या सोबत असत. आता मात्र परिस्थिती बदलत असून सणावारांना घरातील सर्व घटकांचे आत्मीयतेने एकत्र येणे कमी झाले, काही घरांत थांबले. घरातील माणसांच्या एकोपा, प्रेम नष्ट झाल्याची खूण दर्शविणारे हे वर्णन पहा - 'खिडक्या दारांचे डबलबार उडाले/ उंबरठे गरगर फिरून भुईचक्र झाले / स्तब्ध झाले/ रस्त्यांचे साप जळत जळत/ मुळांशी राख राख झाले/ घरांचे भुइनळे/ सुंदर सुंदर रंगप्रकाश/ उधळत; कृतकृत्य झालेयत.' ('संपर्क क्षेत्राच्या बाहेर', पृ. १२१) दिवाळीच्या वेळी खिडक्या, दरवाजे, उंबरठे यांच्यातील परिवर्तन; तसेच रस्त्यांचे साप होऊन जळणे; शेवटी घरांचेच भुइनळे होऊन अल्पावधीत थंडावणे हे कल्पित चित्रण केवळ कवीच्या प्रतिभाशक्तीची उपज म्हणून येत नाही तर यातून कवीला जे अधिकचे सुचवाचे आहे ते बिघडलेल्या मानवी संबंधाविषयीचे भाष्य आहे. कवितेच्या उत्तरार्धात कवी म्हणतो की, माणसे लहान मुले झाली आहेत. तडतडणाऱ्या फुलबाजा हातांत घेऊन ते सर्वच जाळत सुटली आहेत. ते अती आनंदित होऊन उंच उंच उड्या मारताना चित्कारत आहेत. माणसांतली प्रगल्भता जाऊन ते अज्ञानी बालकाच्या बालिशपणाला साजेसे विक्षिप्त वर्तन करीत आहेत. मोठ्या माणसांना दोन भल्या गोष्टी सांगण्यासाठी प्रेम, आधार देणारे आईवडील त्यांच्याजवळ नाहीत हा एक भाग व ज्यांच्या मुलांना आई-बापाने निभावण्याच्या भूमिकेचाच विसर पडलाय या दुसऱ्या भागाकडे कवी लक्ष वेधतो.

महानगरीय जीवन चित्रणाचे दाहक संदर्भ लाखेंच्या कवितांतून येतात. महानगरांतील माणसांना चरितार्थ चालविण्यासाठी घराबाहेर पडावे लागते. नोकरीसाठी ये-जा करणाऱ्या माणसाचे, महाविद्यालयात जाणाऱ्या मुलाचे, शाळेत गेलेल्या मुलीचे किंवा भाजी आणायला गेलेल्या आईचे वेळेत परतून न येणे चिंतेची बाब ठरू शकते. कवितेत मात्र एकाच घरातील ही सर्वच माणसे घराबाहेर पडल्यानंतर परतून आली नसल्याचे

संदर्भ येतात. आणि शेवटी - 'वाट पाहून पाहून अखेर रिकामं घर/ निघालं पोलिसात तक्रार करायला...' ('संपर्क क्षेत्राच्या बाहेर', पृ. १५३) असे विस्मयचकित करणारे वर्णन येते. लाखेंच्या कवितांत अनेक ठिकाणी 'घर' हे प्रतीक म्हणून येते. घराच्या अस्तित्वाचा जो अर्थ विसाव्या शतकापर्यंत होता, तो एकविसाव्या शतकात बदलत असल्याचे सूतोवाच या प्रतिकाच्या योजनेतून करण्यात आलेले आहे. यातून महानगरांतील माणसांच्या आत्मकेंद्री व स्वार्थी मनोवृत्तीवरही प्रकाश पडतो.

कवितेतील 'मी' शहरभर भरकटून झाल्यावरही घराकडे परतताना स्वतःलाच निर्मनुष्य होऊन पाहतो. महानगरातील वास्तव्य त्याला रुचत नाही, पचत नाही. परंतु महानगरात राहण्याच्या अपरिहार्यतेमुळे तो स्वतः या वातावरणाशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करतो. कोलाहल, गतिमान जीवनशैली त्याला नकोशी वाटते. माणसांच्या सावल्या रक्त साकळल्याप्रमाणे एकवटलेल्या वाटू लागतात. या अनुभूतीतून माणसांचे एकत्र येणे एखाद्याला जोराने मुका मार लागल्यावर जसे रक्त शरीरात साकळावे तशी ही माणसे कुठल्या तरी अपघाताने एकत्र येत आहेत. त्यामागे नाईलाज आहे. बहुसंख्येने माणसे एकत्र येऊनही या एकत्र येण्यामागे प्रत्येकाचे काही ना काही कर्तव्य , इप्सित आहे. यात निरागसता, परस्परांशी भेटण्याची असोशी, आनंद नाही. म्हणून कवितेतील 'मी' उदास होतो. तो म्हणतो, 'मी कोलाहलासारखा मल्टीपल झालोय/ आणि माझ्यातून कुणी एकजण/ कानावर घट्ट होत रोखून/ सैरावैरा पळतोय/ शोधत शांततेचा बिंदू/ स्थिर होण्यासाठी' ('संपर्क क्षेत्राच्या बाहेर', पृ. १५८)

संवेदनक्षम व्यक्तीला महानगरातले जीवनव्यवहार तापदायक वाटू लागतात. गती, गर्दी व गोंगाट त्याच्या भावनिकतेवर, हळुवारपणावर आघात करतात. मानवी नात्यांतील कोरडेपणा, कृत्रिमता व पैसाकेंद्री जीवनशैलीचा त्याला तिटकारा वाटू लागतो. शांततेचा स्थिर बिंदू शोधण्यासाठी तो या महानगराबाहेर जावू इच्छितो. या इच्छेतूनच संपर्क क्षेत्राच्या बाहेर राहण्याची मनोवृत्ती तयार झाली असावी. यातूनच त्याला भोवतालच्या जीवनव्यवहारातील अनेक विसंगती जाणवू लागतात. उदाहरणार्थ 'भाषा' या कवितेत कावळ्याचे काव काव करणे, कुत्र्याचे भुंकणे, गाय, गाढव, म्हशीचे हंबरणे, मुंग्या व झुरळांचे आपसातील बोलणे माणूस म्हणून आपल्याला कळत नाही कारण त्यांची व आपली भाषा यातील संदेशवहनात असलेली भिन्नता हे होय. मात्र माणूसच माणसाशी बोलूनही त्याला माणसाचीच भाषा कळू नये, या विसंगतीवर कवी नेमकेपणाने बोट ठेवतो. यामुळे 'पाऊस पाणी' या कवितेतही मंत्री, राजकीय पुढारी व शास्त्रज्ञ यांनी शेती व शेतकऱ्यांचे प्रश्न यांकडे कसे दुर्लक्ष केले आहे, ही विसंगती नेमकेपणाने टिपण्यात आलेली आहे.

दृश्यात्मकता हा लाखेंच्या काव्याभिव्यक्तीचा एक ठळक विशेष होय. त्यांच्या

कवितांत महानगरीय वास्तवाचे चित्रण करणारी दृश्ये येतात. या दृश्यांना अनेक संदर्भ असतात. ही दृश्ये कवीच्या कल्पनाशक्तीतून उद्‌भवतात. उदाहरणार्थ 'mourning walk' या कवितेत सकाळच्या वेळी फिरायला गेलेल्या कवितेतील 'मी'ला जी दिसतात ती दृश्ये म्हणजेच कवितेची संहिता होय. या कवितेत शोकमय दृश्यांची मालिकाच येते. मानवी दृश्य व प्राणी दृश्य अशी दोन प्रकारची दृश्ये यात आहेत. मानवी दृश्यांत माणसांचे वर्तनव्यवहार व प्राणी दृश्यात प्राण्यांचे वर्तनव्यवहार येतात. प्राणी जे आहेत ती कुत्री आहेत. माणसे सकाळच्या ताज्या हवेत फिरताहेत आणि एरवी भुंकणारी कुत्री मात्र सकाळी एकमेकांशी छान खेळत असतात. मानवी दृश्यातून माणसांचे परस्परसंबंध बिघाडाचे सूतोवाच करण्यात येते. उदाहरणार्थ,

'१. एकजण/ हेडफोनवर/ 'मेरे बीचं मे कोई/ आयेगा वाट लगा दूंगा'

'२. 'म्हातारी मरतपण नाही'/ असं एक सून/ दुसऱ्या तरण्या/ सून मैत्रिणीला.'

'३. अजून उठला/ नाही तो./ लोळतोय./ उशिरा / येतो./ पिऊन./ कोणी/ आहे म्हणे/ त्याची/ बाई'

'४. पुढे/ रडत,/ जीव/ द्यावासा/ वाटतो./ ती/ वयानं लहान/ अश्या/ तिच्या/ मैत्रिणीला.' ('संपर्क क्षेत्राच्या बाहेर', पृ. ८७)

या चार दृश्यांच्या मांडणीतून चार घरांतील संबंधविच्छेदाची तीव्र जाणीव करून देण्यात येते. या प्रत्येक दृश्याच्या नंतर कुत्र्यांच्या प्रतिक्रियेचे किंवा प्रतिसादाचे संदर्भ असलेली दृश्ये येतात. या दोन्ही प्रकारच्या दृश्यांचे आंतरसंबंध कवितेच्या अभिव्यक्तीला उठाव देणारे ठरतात. या चार दृश्यांमध्ये माणसांच्या जगण्या-वागण्याच्या वेगवेगळ्या तऱ्हा दर्शविण्यात आलेल्या आहेत. हेडफोनवर बोलणारा आक्रमक पुरुष, म्हातारीच्या मरण्याची वाट पाहणारी दयाशून्य सून, बाहेरख्याली व मद्यपी पुरुष, सासुरवास व अन्य जाचाला कंटाळलेली व जीव देवू पाहणारी नवविवाहिता या प्रत्येकाच्या वागण्यातून त्यांच्या दुःखी असण्याची किंवा दुखावल्या गेल्याची एक समान प्रवृत्ती म्हणून हा morning walk ऐवजी mourning walk ठरतो. हे माणसांचे वर्तन आहे. ही माणसे आपली सुख-दुःखे एकमेकांत वाटून घेताना प्रत्येक दृश्यात दोनच व्यक्ती आहेत. आपली दुःखे ती वेगवेगळी करून आपले मन हलके करतात. याउलट कुत्री मात्र समूहाने खेळताहेत. सकाळच्या वेळी म्हणजेच 'morning walk' ची संकल्पना खऱ्या अर्थाने ते आनंदाने साजरी करतात. उलट माणसांच्या हिंसक, आक्रमक व पीडित मनोवृत्तीचा प्रत्यय आल्यावर ते प्रत्येकवेळी थांबून घेतात. माणसं निघून गेली की, परत खेळू लागतात. जीवन कसे जगावे हे या दृश्यांतील माणसांच्या वर्तनव्यवहारावरून न ठरवता ते कुत्र्यांच्या वर्तनव्यवहारावरून ठरवावे, कुत्री परस्परांशी खेळीमेळीने व उत्फुल्लतेने आनंदाने बागडतांना पाहून माणसांनीही असे आनंदी मनोवृत्तीने जीवन जगावे हा सूचक भाव कवीने या दृश्यात्मक

मांडणीतून साकारलेला आहे.

'काय माहित' या कवितेत प्रियकर व प्रेयसीने लोकांची नजर चुकवून अंधार पडल्यावर भेटण्याचे कथन प्रियकराच्या तोंडून मांडण्यात येते. त्या भेटीसाठीच्या अनेक सूचना तो प्रेयसीला देतो. परंतु प्रत्येक्षात ही सारी दृश्ये त्याच्या मनातील स्वप्न असतात, हे कवितेच्या शेवटी कळते. प्रस्तुत कवितेत साकारलेली दृश्यात्मकता मराठी कवितेत प्रयोगशील ठरावी अशी आहे. तसेच 'अर्धा चहा' या कवितेतील दृश्यांतून अनेक दुर्लक्षित केल्या जाणाऱ्या गोष्टींचे महत्त्व अधोरेखित करण्यात येते. माणूस हे दुर्लक्ष हेतुपूर्वक करीत असतो. माणसाच्या या स्वार्थी वृत्तीचे व पक्षपातीपणाचे संदर्भ कवितेतील दृश्यांच्या निर्मितीचे कारण ठरतात. माणसांनी ठरवलेल्या धारणा, विचार, मूल्ये सौंदर्यसंकल्पनेला प्रभावित करीत असतात. कवितेतील 'मी' सकाळी चहा पिताना आपले आयुष्य थोडेसेच उरलेले आहे. असा विचार अचानक मनात आल्याने अर्धा चहा तसाच ठेवून घराच्या खिडकीजवळ जाऊन बाहेर पाहतो. त्यावेळी तो त्याच्या पत्नीला बोलावतो. खिडकीतून बाहेर मैदानावर उभे असलेले गाढव 'सुंदर' असल्याचे तिला सांगतो. त्याची पत्नी हे गाढव नसून गर्भार गाढवीण आहे, हे सांगते. यानंतर कवितेतील 'मी' गाढवाची 'मुलं' तर खूपच गोजिरवाणी सुंदर असतात असे म्हणतो. प्रस्तुत कवितेत एका घरात सकाळच्या वेळी चहा पिणारे पती-पत्नी हे एक दृश्य व त्यांनी खिडकीतून पाहिलेली गाढवी हे सुंदर दृश्य येते. सुरक्षित निवारा, स्वतःचे घर असूनही कवितेतील 'मी'च्या मनात थोडेस आयुष्य उरल्याची भावना निर्माण होते. त्यामुळे तो अस्वस्थ होतो. गाढवीला असे सुरक्षित घर, निवारा नाही. गर्भार असूनही ती बिनधास्त आहे, हे पाहिल्यावर ती गाढवी कवितेतील 'मी'ला सकारात्मक प्रेरणा देणारी ठरते आणि तो बाजूला ठेवलेला चहा पुन्हा पितो. या दृश्यांतून गाढव या प्राण्याविषयी प्रचलित असलेल्या धारणांना शह देण्यात आलेला आहे. हिंदूधर्मग्रंथातील तत्त्वज्ञानानुसार सर्वात सुंदर स्त्रीचे रूप हे गर्भार स्त्रीचे मानण्यात आलेले आहे. कवितेत गर्भार गाढवीला सुंदर मानण्यात आल्याने प्राणी व माणसांसाठीच्या सौंदर्यकल्पनेत साम्य शोधण्याच्या कवीप्रवृत्तीतून गाढवासारख्या प्राण्याकडेही पाहण्याचा दयाभाव व अभिनव सौंदर्य दृष्टिकोन प्रकट होतो.

'बिविता' या कवितेतून प्रत्ययाला येणारी दृश्यात्मकता वैशिष्ट्यपूर्ण आहे. व्यावहारिक भाषेवर केलेल्या प्रातिभिक संस्कारांतून ही दृश्ये घडवलेली आहेत. या दृश्यांतून महानगरी जीवन वास्तवाचा आशय ध्वनित करण्यात आलेला आहे. कवितेतील 'मी'च्या घराच्या आत व बाहेर घडलेल्या घटनांनी तालबद्ध चित्रमय मांडणी म्हणजे या कवितेतील दृश्ये होत. या दृश्यांच्या योजनेतील प्राधान्यक्रमाची संगती आशय व रुपाला उठाव प्राप्त करून देण्यासाठी पूरक ठरते. कवितेच्या पहिल्याच कडव्यात कुरियर घेऊन आलेला कुरियर बॉय येतो. तो घाम पुसत-पुसत आल्याने त्याच्या कष्टांची दया आलेल्या कवितेतील

'मी'ने त्याला पाणी हवे का? म्हणून विचारल्यावर तो नाही म्हणतो. हे पहिले दृश्य आहे. या दृश्यातील आशयाला 'तो नाही म्हणाला' या ओळीच्या स्वतंत्र मांडणीतून उठाव देण्यात आलेला आहे. यातून कुरियर बॉयने दिलेल्या नकाराकडे ठळकपणे लक्ष वेधण्यात आलेले आहे. एक चांगला माणूस, प्रगल्भ नागरिक समोरील व्यक्तीने दिलेल्या नकाराचा सहजपणे स्वाभाविकरीत्या स्वीकार करीत असतो. हे उत्तम  नागरिक असण्याचे लक्षण होय. यात नकार देणाऱ्या व्यक्तीच्या स्वातंत्र्याचा, भावनांचा आदर केला जातो. मात्र व्यवहारात घडणाऱ्या छोट्या-छोट्या संवादांत, घटना-प्रसंगांत कुणी आपले स्वतंत्र, वेगळे मत नोंदविले आणि ते नकार देणारे असेल तर लोक त्या मताचा, नकाराचा नम्रतेने स्वीकार करीत नाहीत. त्याआड आपला अहंकार येतो. कवितेतील 'मी' पुढेही या अहंकाराबरोबरच आंणखी एक नवीन पेच निर्माण होतो. 'अरे, आता मनात निर्माण झालेल्या दयेचं/ काय करायचं?/ ही गहन समस्या कुरियर बॉयला/ सांगितली तर कळेल का?' / मी सांभाळत बसलो / दयेचं ओझं.' ('अवस्थांतराच्या कविता', पृ. ९) प्रस्तुत ओळीतून कुरियर बॉयविषयी कवितेतील 'मी'च्या मनात निर्माण झालेला दयाभाव संवेदनक्षम भावनाशीलतेचा प्रत्यय देणारा आहे. 'मी'च्या वर्तनातून हे सूचित होते की, आपल्याला छोटी व किरकोळ वाटणारी सेवा व ती देणारा माणूस या दोघांनाही अत्यंत महत्त्व द्यायला हवे. कुरियर बॉयचे घाम पुसत येणे हे वर्णन त्याने घेतलेल्या कष्टांकडे किंवा उन्हातून येण्याकडे लक्ष वेधते. त्याच्याकडे संवेदनक्षमपणे निखळ माणूस म्हणून पाहणे व त्याला आत्मीयतेने पाणी पिण्याविषयी विचारणा करणे या कृतींतून 'मी'च्या कृतज्ञ वृत्तीचा प्रत्यय येतो. आपल्या मनात निर्माण झालेल्या दयेचं काय करायचं? हा प्रश्न 'मी'ला सतावतो. व्यवहारात माणसांची संवेदनशीलता कमी होत असल्याचा अनुभव आपल्याला सातत्याने येत असतो. माणसे माणसांशी दयेने वागत नाहीत. कष्टांत व दुःखात असणाऱ्या माणसाविषयी माणसांना कोणतीही आपुलकी, सहानुभूती वाटत नाही. माणसांच्या मनातील दयाभाव कमी झाल्याचे हे लक्षण होय. कवितेतील 'मी'च्या मनात निर्माण झालेल्या दयेविषयी कुणाशी बोलायचे? हा त्याच्यासमोरील गहन प्रश्न वाचकाला अंतर्मुख व्हायला भाग पाडतो. तो हे दयेचे ओझे आपणच सांभाळत बसलो आहोत, असे कथन करतो.

कवितेत दुसरे दृश्य येते. यात म्हातारे काका वर्तमान पत्राचे बिल घेण्यासाठी कवितेतील 'मी'च्या घरात येतात. आधीच्या दृश्यातील अत्यंत कमी बोलणारा, कामाशी काम ठेवणारा कुरियर बॉय मितभाषी असतो. दुसऱ्या दृश्यातील म्हातारे काका मात्र कवितेतील 'मी'ला माहित नसलेल्या अनेक विषयांवर बोलत राहतात. त्यांचे बोलणे कटकट वाटू लागते. त्यांचा राग येऊन त्यांना गप्प बसा म्हणून किंचाळून सांगावेसे वाटते, परंतु वयस्कर माणसाशी तसे वागता येत नाही. असे कथन येते. कुरियर बॉयविषयी दया निर्माण झालेली होती, म्हाताऱ्या काकांविषयी राग निर्माण होतो. या रागाचं काय करायचं

हा प्रश्न सोडविण्यासाठी मघाशी मनात निर्माण झालेली दया इथे वापरावी असे कवितेतील 'मी'ला वाटते. दयाभाव जागृत झालेल्या 'मी'ने केलेले हे वर्णन पहा, 'मग मी काकांकडे दयेनं बघितलं./ दयाळूपणे पाणी विचारलं./ ते दे म्हणाले/ मला राग नाही आला./ ते पाणी प्यायले आणि परत/ बोलायला लागले./ मी दयाळूपणे त्यांचं बोलणं/ कान मन देऊन ऐकलं./ मग ते गेले./ आता माझ्या मनात/ दया नव्हती./ राग निघून गेला की आहे/ ह्याबद्दल मात्र मी साशंक आहे' ('अवस्थांतराच्या कविता', पृ. १३४)

समकाळातील स्वार्थी झालेल्या व बदललेल्या मानवी वर्तनव्यवहाराकडे लक्ष वेधण्यासाठी योजलेली ही वक्रतायुक्त दृश्यात्मकता दयाभाव या मानवी मूल्याचा ऱ्हास होत असल्याची खूण म्हणून येते. कवितेतील 'मी'ने शेवटच्या दोन ओळींत 'स्व'चे परखड परीक्षण केले आहे. मनात निर्माण झालेल्या रागाच्या समूळ उच्चाटनासाठीचा संभ्रम माणसातील अहंचा प्रभाव दर्शवितो. या अहंच्या नियंत्रणातून माणसाचे सद्वर्तन घडत असते. समकाळातील मितभाषी, कामाचा ताण असलेल्या यांत्रिक मनोवृत्तीच्या माणसाची प्रतिमा कुरियर बॉयमधून आणि मागच्या पिढीतील ऐसपैस वृत्तीच्या, संथपणे जीवन जगणाऱ्या म्हाताऱ्या काकांची प्रतिमा या दृश्यांतून साकारलेली आहे. या दृश्यांतील दोहोंची अस्थिती त्यांचे भाव यातील चित्रमयतेला पूरक ठरतात. 'मी'ने केलेले त्यांच्याविषयीचे भाष्य व त्यांना दिलेल्या प्रतिसादांतून या दृश्यांतील सूचकता व अर्थाचा वक्रतायुक्त आविष्कार कवितेचे वेगळेपण दर्शवितो.

कथनतत्त्व हा लाखेंच्या कवितेचा एक ठळक विशेष होय. लाखेंच्या कवितांत वास्तव व कल्पित घटितांच्या अनेक तऱ्हा विशिष्ट रीतीने सांगितल्या जातात. हे कथन कवितेतील 'मी'च्या माध्यमातून साकारले जाते. कवितेतील 'मी' कवितेतील वास्तवाचा साक्षी म्हणून येतो. उदाहरणार्थ, 'काय माहित' या कवितेत एका रंगकाम करणाऱ्या माणसाच्या मृत्यूचे घटित कथन करण्यात येते. या घटिताला असलेले अनेक संदर्भ कथनाला पूरक ठरतात. एखाद्या कथाकाव्याप्रमाणे आशयाला आरंभ, मध्य व शेवट आहे. परंतु रचनादृष्ट्या मुक्तछंदातील ही ५५ ओळींची कविता तशी आकाराने लहान आहे. शंभर ते दीडशे फूट उंचीवर असलेल्या होर्डिंगवरील घड्याळाच्या जाहिरातीतील घड्याळ रंगविण्याचे काम एक माणूस करीत होता. काम करताना दिवस मावळतीला गेला आहे. सायंकाळ झाली आहे, असे त्या माणसाला वाटते. म्हणून तो खाली पादचारी मार्गाने चालत असलेल्या माणसाला किती वाजलेत हे विचारतो. नेमका त्याच वेळी त्याचा तोल जातो. शंभर दीडशे फूट उंचीवरून तो खाली पडतो. त्याला जागेवरच मृत्यू येतो. पादचारी 'पाच वाजून' एवढेच बोलतो. कारण क्षणार्धात घड्याळ रंगविणारा माणूस मृत्यूमुखी पडलेला असतो. अशा प्रकारे घटनांचे कथन कवितेच्या पूर्वार्धात येतो. उत्तरार्धात उंचावरून कोसळताना मृत्यू येण्यापूर्वीच्या अल्प वेळेत त्या रंगकाम करणाऱ्या माणसाच्या मनात कोणते विचार

आले असतील याचा अदमास 'मी'च्या कथनातून घेतला जातो. उदाहरणार्थ, 'बायको मुलं वाट पाहत असतील/ बायकोचं औषध, मुलांच्या वह्या घ्यायच्या आहेत/ घड्याळ पूर्ण रंगवून झालं नाहीय तर/ पैसे आज मिळतील की नाही, कोण जाणे,/ वगैरे विचार/ घड्याळ रंगवणाऱ्या माणसाच्या मनात/ खाली पडताना आले' ('संपर्क क्षेत्राच्या बाहेर', पृ. ७)

या कथनातून रंगकाम करणाऱ्या माणसाच्या कौटुंबिक स्थितीची कल्पना येते. त्याची बायको आजारी असल्याने तिला न्यायच्या औषधाच्या संदर्भावरून कळते. या माणसाला मुले आहेत आणि त्यांना वह्या घ्यायच्या असतात. घड्याळ पूर्ण रंगवून झाल्यावर त्याला आज पैसे मिळणार असतात. त्या पैशांतूनच वस्तूंची खरेदी करून तो घरी घेऊन जाणार असतो. परंतु शंभर दीडशे फूट उंचीवरील होर्डिंगवरून तोल जाऊन पडल्याने हे होणे शक्य नाही, हे वास्तव असते. कारण घड्याळ पूर्ण रंगवून झालेले नसते. त्यांमुळे माणूस मरून गेल्यानंतरही त्याची मजुरी मिळेल की नाही? हा प्रश्न रंगकाम करणाऱ्या माणसाच्या मनात येतो. या कथनातून कवी मजुरीने रंगकामासारखे काम करणाऱ्या माणसांच्या शोषणाची जाणीव करून देतो. किती वाजले ही वेळ सांगणाऱ्या पादचाऱ्यालाही हळहळ वाटते. तो घड्याळासमोर मरणाऱ्या माणसाला वाचवू शकलो नाही म्हणून मनातून चरफडतो. या कथनातून एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूला थांबवू न शकणाऱ्या माणसाची हतबलता जशी ठळक होते तशीच इतक्या उंचीवरचे रंगकाम करताना सुरक्षा न देता तोकडी मजुरी देवून त्या माणसाच्या जीव जायला कारणीभूत ठरलेल्या घड्याळाच्या कंपनीची जाहिरात करायला सांगणाऱ्या व्यवस्थापनाचाही दोष असल्याचे सूचित करण्यात येते. यातून कंपन्यांची जाहिरातींसाठीची स्पर्धा सामान्य माणसाच्या जीवावर उठलेली असल्याचा प्रत्यय उदाहरणादाखल येतो. यापुढे या कपंन्या वेगवेगळ्या पद्धतीने शोषण करू शकतात, असा गर्भित अर्थही या कथनातून ध्वनित होतो. या कवितेच्या कथनातील शेवटचा भाग पहा, 'अर्धवट रंगवलेलं घड्याळ/ आता कोण पूर्ण करील?/ त्या घड्याळात/ कुठली वेळ दाखवली जाईल?/ वगैरे वगैरे/ काय माहित.' ('संपर्क क्षेत्राच्या बाहेर', पृ. ८०) या कथनातून उपरोधकरित्या प्रश्न उपस्थित केलेले आहेत. यातून अर्धवट रंगवलेलं घड्याळ हे अर्धवट जीवन जगलेल्या माणसाचे प्रतीक म्हणून येते. ज्याला कोणी पूर्ण करेल असे वाटत नाही. घड्याळात दाखविण्याची वेळ शक्यतो दहा वाजून दहा मिनिटांची असते. त्या वेळेला जपानमधील हिरोशिमा व नागासाकी या शहरांवर अमेरिकेने केलेल्या आण्विक हल्याचा संदर्भ आहे. येथे रंगकाम करणाऱ्या माणसाने अर्धवट रंगवलेल्या घड्याळाचे रंगकाम पूर्ण झालेच तर त्यातील वेळेबाबत साशंकता उपस्थित करून कवी अशा प्रकारच्या मृत्यूचीही वेळ त्यात नोंदवायला हवी असा भाव सूचित करतो.

'पीपहोल' या कवितेतील कथनही नाट्यात्मक संवादाने नियत झालेले आहे. कवितेतील 'मी'ने त्याच्या दारावरील बेल वाजवून दाराबाहेर कोण-कोण येऊन गेले

याचे कथन केलेले आहे. प्रथम सैतान नंतर देव व शेवटी माणूस येऊन डोअर बेल वाजवतो. प्रत्येक वेळी कवितेतील 'मी' पीपहोलमधून पाहतो, बाहेरील व्यक्तीचा अदमास घेवून घराचा दरवाजा उघडतो. सैतान व देव आल्यावर तो पटकन दरवाजा उघडतो. मात्र बाहेर एक अनोळखी माणूस उभा असलेला पाहून तो दरवाजा उघडत नाही. त्याच्याशी संवादही करीत नाही. या कथनातील 'मी'चे वर्तन हा या कवितेत सौंदर्य निर्माण करणारा महत्त्वाचा घटक. या कवितेत देव, सैतान व माणूस ही तीन प्रतीके आलेली आहेत. या तीनही प्रतिकांच्या योजनेला समकालीनतेचे संदर्भ आहेत. विशेषतः समकालीन जीवनव्यवहारात पैसाकेंद्री वृत्ती केंद्रस्थानी आलेली आहे. प्रत्येक वस्तूच्या विक्रेय मूल्याचा विचार महत्त्वाचा बनल्याने मानवी जीवनात असलेले चैतन्य, निरागसता हरवत जावून माणूस आनंदानुभूतींना पारखा होत आहे. जागतिकीकरणाच्या प्रभावाने धर्मव्यवस्थेवर मोठा ताण निर्माण झाल्याचे दिसत आहे. देव व सैतान या दोहोंचा धर्माशी संबंध आहे. ही सुष्ट व दुष्ट प्रवृत्तीची प्रतीके आहेत. दोहोंनाही विक्रीस काढल्याचे कथन कवितेतून येते. मानवाच्या आजवरच्या इतिहासात प्रथमच बाजारकेंद्री व्यवस्था अत्यंत प्रभावशाली झालेली आहे, या वास्तवाचे सूतोवाच करण्यात आलेले आहे. या व्यवस्थेत सैतान कोण? आणि देव कोण? हे ओळखणे अत्यंत कठीण आहे. धार्मिक आचरणाची शिकवण देणाऱ्या गुरूला देव मानून त्यांची सेवा करणाऱ्या भक्तांना गुरुमध्ये देवाऐवजी सैतानाची अनुभूती येऊ शकते. किंवा आपल्याच आजूबाजूला राहणाऱ्या देववत वाटणाऱ्या माणसांच्या हिंसक वागण्यातून सैतानी वृत्तीचा प्रत्यय येऊ शकतो. भ्रष्ट समाजात स्वतःला एखादे चुकीचे काम करून घेण्यासाठी दुष्टांची मदत घ्यावी लागते. त्यासाठी तो पैसा देवून सैतानी मदत विकत घेतो. कवितेतील 'मी'ला देव, सैतान व माणूसही नकोय. त्याने केलेले हे अनोखे कथन पहा, 'डोअरबेल वाजली./ पीपहोल मधून पाहिलं./ बाहेर सैतान उभा होता./ मी दरवाजा उघडला/ 'माझ्याकडे देव आहेत/ विकत घेता का साहेब?'/ 'पण तू देव का विकतोयस?'/ 'जगता सैतान लई झालेत साहेब/ म्हणून'/ मी म्हटलं 'मला नकोत देव'/ आणि दरवाजा बंद करून घेतला' ('अवस्थांतराच्या कविता', पृ.१६८)

हे वरवरचे वर्णन, घडलेल्या गोष्टींचे कथन नाही. या कथनातील सूचकता त्यातील नाट्यात व भाषिक योजनेत आहे. कवितेची सुरुवात 'डोअरबेल वाजली' या दोन शब्दांच्या ओळीने होते. सामान्यपणे घराच्या दरवाजाला पीपहोल बसवणे, डोअरबेल बसवणे या बाबी महानगरातील घराचे चित्र डोळ्यांपुढे उभे करतात. घराचा दरवाजा आतून बंद असल्याने बाहेरून येणाऱ्या व्यक्तीला डोअरबेल वाजवावी लागते. ती वाजली की, आतील माणसाला आपल्याकडे कुणीतरी आल्याचे समजते. मग तो पीपहोलमधून डोकावतो. अनोळखी किंवा नको असलेली व्यक्ती दाराबाहेर असेल तर घराचा दरवाजाही उघडण्यात येत नाही. डोअरबेल व पीपहोल या दोन गोष्टी महानगरातील माणसांच्या भीतीयुक्त जीवन

जगण्याची तऱ्हा म्हणून येतात. दाराबाहेर सैतान उभा असल्याचे कथन वाचून वाचकांना धक्का बसू शकतो. परंतु कवी एवढ्यावरच न थांबता कवितेतील 'मी'चे सैतानाशी बोलणे, तो विकत असलेले देव नाकारणे व पुन्हा दरवाजा बंद करून घेणे, या कल्पित घटनांची योजना करून वाचकांना आणखी धक्के देतो. यातील वक्रता वाखाणण्याजोगी आहे. उदाहरणार्थ दारात उभा असलेला सैतान बघून कु णीही दरवाजा उघडणार नाही. मग कवितेतील 'मी' ने तो का उघडला? या प्रश्नाचे उत्तर त्वरित मिळते. सैतान देव विकण्यासाठी आलेला असतो. तो देव विकत घेण्याचा आग्रह यासाठी करतो की, जगात सैतानाची संख्या खूप जास्त झालेली आहे. या कथनाविषयी अनेक प्रश्न निर्माण होतात. सैतानाच जगात सैतान जास्त झाल्याचे जे सांगतो हे खरे मानले तर मग सैतान देव कशासाठी विकतोय? सैतान तर नेहमीच देवांच्या विरुद्ध पक्षातील राहिला आहे. मग तो जगात वाढलेल्या सैतानांविषयीच्या तक्रारीचा सूर का आळवतोय? देव विकणारा सैतान व जगातील इतर सैतान यांच्यात सैतान फरक का करतो? तो ज्यांना सैतान म्हणते ते कोण आहेत? या प्रश्नांची उत्तरे शोधण्यापूर्वी सैतानाची संकल्पना धर्मग्रंथात कशी आलेली आहे, ते थोडक्यात पाहू,

अ. र. कुलकर्णी यांनी मराठी विश्वकोशात लिहिलेल्या नोंदीत सैतान हे दुष्ट प्रवृत्तीचे, शक्तीचे एक अतिमानुष रूप मानले गेले असून सैतान या शब्दाचा अर्थ विरोध करणे, कट करणे असा सांगितला आहे. सैतान हा माणसे, दैवी प्रवृत्तीचे देवदूत आणि कोणी एखाद्या विशिष्ट प्रतिपक्षी अशा तीन प्रकारच्या जीवांना विरोध करतो. ज्यू, ख्रिस्ती इस्लाम, बौद्ध व पारसी या पाचही धर्मात सैतान दुष्ट म्हणूनच येतो. हिंदू धर्मात सैतानाची कल्पना नाही. ज्यू धर्मानुसार सध्याचे युग हे सैतानाचे युग असून या युगात सैतानाची सत्ता चालते आहे. या युगाच्या शेवटी ती संपून ईश्वराचे युग सुरू होईल अशी धारणा आहे. सैतानाच्या राज्यात पापाचा प्रभाव अधिक आहे. माणूस त्याने प्रभावित होतो. ते घालविण्यासाठी ईश्वराची योजना प्रभावी ठरते अशी धारणा आहे. या धारणेनुसार विचार केला तर सैतानच देव देण्यासाठी येतो. परंतु कवितेतील 'मी' देव घेणे नाकारतो. या घटितातील देव घेताना तो 'विकत' घ्यावा लागणार असल्याने त्याला किंमत आहे, परंतु त्याची मौलिकता (देवत्व) उरले नसल्याचे उपहासात्मक भान या कथनातून प्रकट होते. जगात सैतान खूप झालेत म्हणणाऱ्या सैतानावर विश्वास करण्याचे कारण नसावे, म्हणून कवितेतील 'मी' सैतानाच्या या विधानाला कवडीमोल मानतो. सैतानावर विश्वास करणे आत्मघातकी ठरेल म्हणून कवितेतील 'मी' घराचा दरवाजा आतून लावून घेतो. कथनाचा एक भाग येथे संपतो. कथनाच्या आवृत्तीत कवितेचे सौंदर्य दडलेले आहे. याचा प्रत्यय परत डोअरबेल वाजवणे, पीपहोलमधून पाहणे व सैतानाच्या जागी देवाचे, त्याने देव विकण्याऐवजी सैतान विकत घेण्याची विचारणा करणे आणि कथन करणाऱ्याने सैतानाला

दिलेल्या नकाराप्रमाणे देवालाही नकार देवून दरवाजा बंद करून घेणे, ही कथनकाराची कृती देव व सैतानाला दिलेल्या प्रतिसादाबाबत एकसारखी आहे. जगात देव लई झालेत हे देवाचे वक्तव्य व सैतान लई झालेत हे सैतानाचे वक्तव्य या दोनही वक्तव्यांवर कवितेतील 'मी'ने दिलेला प्रतिसाद अत्यंत सावध असा आहे. तो दोहोंवर विश्वास ठेवत नाही. कारण हे दोघेही देत असलेली गोष्ट 'विकत' देत आहेत. समकाळात दैवी आणि सैतानी या दोनही शक्ती पैशांपुढे क्षुल्लक ठरत असल्याचे नवे कालभान 'पीपहोल' कवितेतून व्यक्त झालेले आहे. पैसाकेंद्री जीवनमूल्ये जगण्याचे नवे तत्त्वज्ञान बनत आहे. त्यापुढे धर्म नतमस्तक झाल्यामुळे सैतान व देव या सुष्ट व दुष्ट प्रवृत्ती परस्परांविरुद्ध लढायचे सोडून त्याही पैशालाच महत्त्व देत आहेत. या नव्या तत्त्वज्ञानाला अंगिकारणारा माणूस त्याची स्वतःचीच माणूस म्हणून 'ओळख' हरवून बसलेला असल्याने तो कवितेतील 'मी'ला अनोळखी वाटतो. त्यामुळे परत डोअरबेल वाजूनही, पीपहोलमधून पाहिल्यावर या माणसाच्या अनोळखीपणाच्या भीती व तिरस्कारामुळे 'मी' दरवाजा उघडत नाही. या कवितेतील 'मी' हा संवेदनक्षम कविमनाचे, विवेकी सजग तार्किक व बुद्धिजीवींचे प्रातिनिधिक प्रतीक म्हणून आलेला आहे. भीतीचे व संशयाचे निवारण करण्यासाठीची कृतो म्हणून 'पीपहोलमधून पाहणे' ही प्रतिमा समकालीन मानवी प्रवृत्तीचे निदर्शक म्हणून येते.

थोडक्यात सैतान व देव यांच्यापेक्षा माणूस स्वतःला श्रेष्ठ समजू लागला आहे. त्याने पैसा या गोष्टीला अवाजवी महत्त्व दिल्यामुळे तो स्वतःचीच 'ओळख' हरवून बसलेला आहे. बुद्धिजीवींनी अशा माणसाला त्याच्या या दुष्प्रवृत्तींपासून परावृत्त करण्याचे प्रयत्न करण्याऐवजी त्यांनी आपल्याच घराचे दरवाजे लावून घेतले आहेत, म्हणजे त्याकडे मूकपणे डोळेझाक केलेली आहे. ही तत्त्वज्ञानात्मक गोची प्रस्तुत कवितेतील कथनाचे मुख्य सूत्र आहे. हे कथन समकालीन मराठी कवितेच्या आशय व अभिव्यक्तीच्या कक्षा रुंदावणारे आहे. लाखेंच्या 'मिशीचे तत्त्वज्ञान', 'जन्मदिवस/ दोन एप्रिल १९५३', 'चोर शिपाईचा खेळखंडोबा मोठेपणी', 'चिल्लर मी' व 'अवस्थांतराच्या कविता' या कवितांतील कथन समकालीन मराठी कवितेतील त्यांच्या अभिव्यक्तीचे वेगळेपण दर्शविणारे आहे.

'धूर' हे विनाशाचे प्रतीक म्हणून लाखेंच्या कवितेत येते. धुराने स्वतःला व्यापल्याची अनुभूती 'धुधुर' कवितेतून प्रकट करण्यात आलेली आहे. गद्य स्वरुपात केलेली अभिव्यक्ती म्हणून 'ध्यान' ही कविता वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यात दुपारच्या वेळी एका देवीच्या देवळात ध्यान करण्यासाठी येणारा साधक व देवळात खेळणारी मुले यांचे वर्णन करण्यात येते. ध्यान करणाऱ्याला मुलांकडून ध्यानात अडथळे निर्माण झाल्याने तो वैतागून त्यांच्या मागे धावतो. ते खिदळत, पळत, खांबांआड लपतात. त्यालाही मजा वाटते. शेवटी ध्यान करण्याऐवजी तो रोज दुपारी मुलांसमवेत खेळ खेळतो. मुलेही तो आल्याशिवाय खेळ सुरू करीत नाहीत. या कवितेची रचना दृश्य स्वरुपात गद्याप्रमाणे वाटत असली तरी त्यातील

चित्रमयता, छोट्या-छोट्या वाक्ययोजना, कथन कवितेतील गद्याला लयबद्धता प्राप्त करून देते. जगण्याची लय हरवलेला साधक ध्यान करून काही शोधण्याऐवजी मुलांसमवेत खेळलेल्या खेळातून जीवनातील आनंदानुभूतींचा प्रत्यय घेतो तेव्हा हेच त्याचे ध्यान ठरते. यामुळे कवितेची रचना गद्य स्वरुपात केलेली असावी.

लाखेंच्या कवितेतील 'मी'ला जगण्याचा उबग येतो. आजूबाजूची जिवंत माणसे तापदायक वाटतात, महानगरातले जीवन कोंडी करणारे वाटते म्हणून तो कधी निर्जीव वस्तूंसमवेत तादात्मीकरण करून घेतो, कल्पित व्यक्तींशी संवाद करतो तर कधी आत्मसंवाद, आत्मशोध घेता-घेता ईश्वराशी संवादी होतो. आपल्यालाच विठ्ठलाचे दर्शन घडल्याचा साक्षात्कारही 'दर्शन' या कवितेतून मांडण्यात येतो. अनेक नावार्थबोधक वाक्ययोजनांतून नवीन काव्यभाषा घडविण्याचा प्रयत्न कवीने केला आहे. उदा. 'मी मलाच शब्द दिला होता,/ जीव दिल्यासारखा', 'ओळींच्या अधुरेपणात एकटा राहता मी', 'भिंत आशयपूर्ण बोलत असते/ म स्वच्छपणे ऐकत असतो', 'मी मनखुजा झालो', मनाच्या टिपणात रात्री जिवंत असणे, आपल्यावर बसलेले प्रेम उडून जाणे, अंगात झिम्म भिनणे यासारख्या अनेक काव्यात्मक विधानांतून नवीन काव्यभाषेचा प्रत्यय येतो.

लाखेंच्या कवितांत उपहासात्मक अभिव्यक्तीची अनेक उदाहरणे आहेत. कमीत कमी शब्दांत विशिष्ट पद्धतीने घडविलेले कवितेचे रूप वेधक आहे. उदाहरणार्थ, 'दर्शन' ही कविता पहा, 'कितीही उपासतापास कर./जप कर नामस्मरण कर/ आदळआपट कर/ डोकं बडवून घे / हैराण हो./ मी तुला दर्शन देणार नाहीय/ देवा./ जा.'('अवस्थांतराच्या कविता', पृ.९१) या संहितेतील छोट्या-छोट्या वाक्ययोजना चटकन नजरेत भरतात. भक्ताने देवाला दर्शन देण्यासाठी विनंती करण्याऐवजी देवालाच दर्शन देण्याचे नाकारणारा भक्त; या विपरीत घटितामुळे निर्माण झालेली अतिशयोक्ती वाचकाला धक्का देते. कवितेच्या सुरुवातीला व शेवटी अन्य संदर्भ न देता संवादाची अभिव्यक्ती साधल्याने कमीत कमी शब्दांत अर्थवाही आशय घडविण्यात आलेला आहे. अशीच विपरीत अभिव्यक्ती 'श्राद्ध'या कवितेत करण्यात आलेली आहे. मेलेल्या कावळ्यांचे श्राद्ध घालून , त्यांच्या पिंडाला माणूस शिवतो का? त्याची वाट पाहणारा, नाहीच कुणी शिवले तर मी आहेच की, असे कथन करणारा कवितेतील 'मी' मराठी कवितेतील वाचकांसाठी नवीन आहे. आशयाचे अनेक पदर उलगडून दाखविण्यासाठी जगण्यातील गुंतागुंत दर्शविण्यासाठी अशा प्रकारे कवितेत 'मी'ची योजना करण्यात येते.

मानवी आयुष्य उजळवून टाकणारा आतला स्वसंवेद्य आवाज आपल्याला काढला यायला हवा, अशी असोशी लाखेंच्या काव्याभिव्यक्तीतून प्रकट होते. त्यामुळे निरागस व स्वच्छ मूल्यदृष्टीचा प्रत्यय त्यातील वैचारिकतेतून येतो. भोवतालची माणसे व त्यांचे व्यवहार कवितेतील 'मी'ला वैताग देणारे वाटल्याने तो स्वतःचीच चौफेर तपासणी करतो. स्वतःला

विविध रूपांत, वस्तूंत घालून तपासून पाहतो. आपल्या भावना, विचार व संवेदनांचीही उलट सुलट मांडणी करून विविध अवस्थांतरांचा आढावा घेतो. उदाहरणार्थ, 'जन्म मुका/ मृत्यू मुका/ मध्ये फक्त/ वाचेच्या चुका.. ' ('अवस्थांतराच्या कविता', पृ.१९६) अशा निष्कर्षाप्रत येऊन थांबतो. आपल्या वाचेच्या चुका दुरुस्त करणे हेच आपल्या जीविताचे ध्येय असल्याचे भान प्रकट होते. अशा पराकोटीच्या तटस्थ वृत्तीमुळे आपल्या एकांतात आनंद शोधण्याची सवय वाढीस लागते. भौतिक जगातील माणसांशी असलेले सर्व प्रकारचे संपर्क शून्यावस्थेत नेवून ठेवले जातात. आपली आत्ममग्नताच जिवंत सळसळते अवकाश असल्याची अनुभूती मांडण्यात आलेली आहे. भौतिक गोष्टींनी उबगलेल्या 'मी' ला त्याच्या आत्मिक सुखासाठी, निरामय आनंदासाठी असे संपर्कक्षेत्राच्या बाहेर जावेसे वाटते. जिथे फक्त 'स्व'ची स्वतःशी भेट होईल. ही वैचारिक जाणीव या कवितांतून ध्वनित होते. कवितेतील 'मी'ला आपल्या अनुभूती या कोणाही संवेदनशील, हळव्या मनाव्या व्यक्तीला आलेल्या असू शकतात, त्याला त्या आपल्या वाटू शकतात. समाजात अशा व्यक्तींची संख्या नगण्य असल्याने या कवितांतील अनुभव बहुसंख्य वाचकांना अनघड वाटू शकतात.

प्रस्तुत लेखात लाखेंच्या सुमारे २४० कवितांतून निवडक संहितांचे विशेष नोंदविण्यात आलेले आहेत. कवीच्या व्यापक जीवनदृष्टीचा प्रत्यय यातून येतो. जगण्याचे तत्त्वज्ञान तपासून पाहण्याची असोशी कवीची वैशिष्ट्यपूर्ण शैली घडायला कारणीभूत ठरते. या कवितांतील बौद्धिक जाणीवा, स्त्रीचित्रण, प्रेमजाणीवा, लैंगिकतेचे संदर्भ मानसशास्त्रीय संदर्भ, धार्मिक भान, भाषाभान, आदी ठळक विशेषांचे विश्लेषण करण्यासाठी अभ्यासाची दिशा सूचित होते. ही कविता वरवर वाचून पुढे सरकरणाऱ्या वाचकाचा अपेक्षाभंग करू शकते. कवितेतून वाचकाला थेट आवाहन केले जात नाही. वाचकाकडून प्रतिसाद व परिणामांची अपेक्षा केली जात नाही. वाचकाच्या अर्थनिर्णयन क्षमतेला गृहित धरून संहिता घडविली जाते. कवितेतील 'मी'च्या अभिव्यक्तीला केंद्रस्थान दिलेले असल्याने कवितेच्या रूपघडणीकडे हेतुपूर्वक स्वतंत्र लक्ष दिले जात नाही. त्यामुळे वाचकांना अपरिचित असलेल्या आशय व रूपाच्या एकात्म आविष्काराची प्रचीती या कवितांतून मिळते. या कवितांतील चिंतनात्मकता, संवादात्मकता, प्रयोगशीलता, दृश्यात्मकता, त्यातील कथनत्त्व आदी विशेषांमुळे रवींद्र दामोदर लाखे हे समकालीन मराठी कवितेच्या प्रवाहातील एक महत्त्वाचे कवी ठरतात.

(डॉ. अरुण ठोके, ८०६, जे. पी. रो-हाऊस, ओंकारेश्वरनगर, साईनगरजवळ, अमृतधाम, पंचवटी, नाशिक-४२२००३. भ्रमणध्वनी : ९१७५१६४७९९)